आकाशवाणी मुंबई
प्रादेशिक बातमीपत्र - दुपारी ३.०० वाजता
१४ मे २०२६ -गुरुवार

**ठळक बातम्या**

- केंद्र सरकारकडून साखरेच्या निर्यातीवर तात्काळ प्रभावाने बंदी

- पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्याच्या सुधारित धोरणाला राज्य मंत्रिमंडळ बैठकीत मान्यता

- आयात केलेल्या खाद्यतेलाचा वापर कमी करण्यासाठी पामतेल तसंच सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा आणि मोहरीच्या तेलाच्या वापराला राज्य सरकारचं प्राधान्य

- राज्य विधानपरिषदेवर निवडून आलेल्या १० नवनिर्वाचित सदस्यांनी घेतली शपथ

**आणि**

- राज्यात मतदार याद्यांच्या विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरु होणार

<><><><><>

केंद्र सरकारनं साखरेच्या निर्यातीवर बंदी घातली असून यामध्ये कच्च्या, पांढऱ्या आणि शुद्ध साखरेचा समावेश आहे, ही बंदी तात्काळ प्रभावानं सप्टेंबर २०२६ पर्यंत किंवा पुढील सूचना येईपर्यंत लागू असेल. साखरेचा देशांतर्गत पुरवठा सुनिश्चित करणं आणि स्थानिक किमतींवर नियंत्रण ठेवणं हा यामागचा उद्देश आहे. मात्र युरोपियन युनिअन आणि अमेरिकेसाठी काही विशिष्ट कोट्याकरता अपवाद असून केवळ त्यासाठी साखरेची निर्यात केली जाऊ शकते. त्याचप्रमाणे सध्या प्रत्यक्ष निर्यात प्रक्रियेत असलेल्या मालाला देखील यातून सूट देण्यात आली आहे.

<><><><><>

मृद आणि जलसंधारण विभागाचा सुधारित आकृतीबंध निश्चित करायला राज्य मंत्रिमंडळाने मान्यता दिली असून राज्यातल्या ८ हजार ७६७ पदांना मान्यता देण्यात आली आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली आज मुंबईत झालेल्या मंत्रिमंडळाच्या बैठकीत हा निर्णय झाला. मृद आणि जलसंधारण विभागाच्या क्षेत्रीय यंत्रणेची फेररचनाही होणार आहे.

वैद्यकीय संस्थांच्या इमारतींसाठी विकास शुल्कामधे ५० टक्के सवलत देण्याला मंत्रिमंडळाने मंजुरी दिली आहे. तसंच पुणे महानगरपालिकेच्या पुणे नदी पुनरूज्जीवन प्रकल्पातल्या मुळा-मुठा नदीच्या विकासासाठी तीन शासकीय जमिनी हस्तांतरित करण्याचा निर्णय आज झाला. संत्री आयात शुल्क परतावा योजना रद्द करणे, पाटबंधारे प्रकल्पांच्या जलाशयातील गाळ आणि गाळमिश्रित वाळू काढण्याच्या सुधारित धोरणाला मंजुरी, महाराष्ट्र राज्य अनुसूचित जमाती आयोग अधिनियम, २०२५मध्ये सुधारणा करण्यास मान्यता, नाशिक जिल्ह्यातल्या अंबोली-वेळुंजे प्रवाही वळण योजना प्रकल्पासाठी ४९ कोटी २६ लाख रुपयांच्या तरतुदीस मान्यता, नाशिक इथल्या कुसुमाग्रज प्रतिष्ठान संस्थेला दरवर्षी दहा लाख रुपये अनुदान देणे आदी निर्णय आजच्या मंत्रिमंडळ बैठकीत झाले.

<><><><><>

राज्यातल्या वाहन सुरक्षेला अधिक बळकटी देण्यासाठी येत्या एक जुलैपासून वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक बसवणं अनिवार्य असून त्यासाठी राज्य सरकारनं वाहनधारकांना ३० जून पर्यंत मुदतवाढ दिली आहे, अशी माहिती परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिली आहे. या नियमाचं उल्लंघन केल्यास एक हजार रुपयांचा दंड आकारला जाणार आहे. वाहनांची ओळख अधिक सुरक्षित आणि पारदर्शक करण्याच्या उद्देशानं राज्य सरकारनं १ एप्रिल २०१९ पूर्वी नोंदणी झालेल्या जुन्या वाहनांना उच्च सुरक्षा नोंदणी क्रमांक प्लेट बसवणं अनिवार्य केलं आहे.

<><><><><>

आयात केलेल्या खाद्य तेलाचा वापर कमी करण्यासाठी राज्य सरकारकडून पामतेल तसंच सोयाबीन तेलाऐवजी शेंगदाणा आणि मोहरीच्या तेलाच्या वापराला शासकीय उपहारगृह, अंगणवाडी, रुग्णालयं आणि वसतिगृहांमध्ये प्राधान्य दिलं जाणार आहे. यासाठी मेन्यूतही बदल केला जाणार आहे. काटकसर आणि इंधन बचतीसाठी सरकारनं काल प्रसिद्ध केलेल्या परिपत्रकात हे आदेश नमूद आहेत. कोणत्याही कारणांसाठी बाइक रॅली, वाहनांच्या मिरवणुकांना पोलिसांनी परवानगी देऊ नये असे आदेश राज्य सरकारनं दिले आहेत. मुंबईसह मोठ्या शहरांमध्ये रेस्टॉरंट आणि हॉटेलांमध्ये पीएनजीचा वापर बंधनकारक केला आहे. तसंच प्रधानमंत्री उज्ज्वला योजनेतल्या दुबार नोंदी काढण्याचे आदेशही सरकारनं दिले आहेत. गैरशेती वापरासाठी युरियाचा गैरवापर रोखण्याचे आदेशही सरकारनं दिले आहेत. खतांचा

तर्कसंगत वापर करण्यासाठी कृषी विभागानं माती परीक्षणाची मोहिम राबवावी असंही या परिपत्रकात नमूद आहे. शासकीय जाहिरातींसाठी अनावश्यक खर्च टाळावा तसंच सजावटीचे दिवे, फ्लेक्स, बॅनर, यांच्या कमीत कमी वापर करावा. डिजिटल फ्लेक्ससाठी जनरेटर वापरु नये असंही सरकारनं म्हटलं आहे. सर्व प्रशासकीय विभागांनी ६ महिन्यांसाठी सल्लागारांची नियुक्ती करु नये अशे निर्देशही या परिपत्रकात नमूद आहेत.

<><><><>

राज्य विधानपरिषदेवर निवडून आलेल्या १० नवनिर्वाचित सदस्यांचा आज शपथविधी झाला. विधानपरिषदेचे सभापती राम शिंदे यांनी त्यांना पद आणि गोपनियतेची शपथ दिली. यात शिवसेनेच्या डॉ. नीलम गोऱ्हे, बच्चू कडू, तसंच भाजपाच्या डॉ. प्रज्ञा सातव, प्रमोद जठार, माधवी नाईक, सुनील कर्जतकर, विवेक कोल्हे आणि संजय भेंडे यांचा समावेश आहे. त्याचप्रमाणे शिवसेना उद्धव बाळासाहेब ठाकरे पक्षाचे अंबादास दानवे आणि राष्ट्रवादी काँग्रेस पक्षाचे झिशान सिद्दीकी यांनीही विधानपरिषद सदस्यत्वाची शपथ घेतली.

<><><><>

राज्यात मतदार यादीच्या SIR अर्थात मतदार यादी विशेष सखोल पुनरीक्षणाची प्रक्रिया ३० जूनपासून सुरू होणार आहे. केंद्रीय निवडणूक आयोगानं आज १६ राज्य आणि ३ केंद्र शासित प्रदेशातल्या विशेष सखोल पुनरीक्षण प्रक्रियेचं वेळापत्रक जाहीर केलं. त्यानुसार राज्यात ३० जून ते २९ जुलै दरम्यान बीएलओ अर्थात मतदान केंद्रस्तरीय अधिकारी घरोघरी भेटी देऊन मतदारांची पडताळणी करतील. त्यानंतर ५ ऑगस्ट रोजी मतदार यादीचा मसुदा प्रसिद्ध होईल. ५ ऑगस्ट ते ४ सप्टेंबर दरम्यान हरकती दाखल करता येतील. या हरकतींवर ३ ऑक्टोबरपर्यंत सुनावणी होऊन निकाल दिले जातील आणि ७ ऑक्टोबरला राज्याची अंतिम मतदार यादी प्रसिद्ध होईल. १ ऑक्टोबरपर्यंत वयाची १८ वर्ष पूर्ण करणाऱ्या नागरिकांची नावं या मतदार यादीत समाविष्ट होतील. राज्यात सध्या ९ कोटी ८६ लाख ६४ हजार ४१३ मतदारांची नोंद आहे.

<><><><>

केरळचे नवे मुख्यमंत्री म्हणून व्ही. डी. सतीशन यांचं नाव निश्चित झालं आहे. काँग्रेसने आज नवी दिल्लीत घेतलेल्या पत्रकार परिषदेत काँग्रेसचे ज्येष्ठ नेते दीपा दासमुन्शी, मुकुल वासनिक आणि अजय माकन यांनी सतीशन यांच्या नावाची घोषणा केली. कोची जिल्ह्याचे

मूळ रहिवासी असलेले सतीशन २००१ मध्ये परवूर मतदारसंघातून केरळच्या विधानसभेवर आमदार म्हणून पहिल्यांदा निवडून आले होते. २०२१मध्ये विधानसभा निवडणुकीत काँग्रेस प्रणित यूडीएफच्या पराभवानंतर सतीशन यांची विरोधी पक्षनेतेपदी निवड करण्यात आली होती.

<><><><><>

आयपीएल क्रिकेट स्पर्धेत आज पंजाब किंग्ज आणि मुंबई इंडियन्स यांच्यात लढत होणार आहे. हा सामना हिमाचल प्रदेशातल्या धरमशाला इथं संध्याकाळी साडेसात वाजता होणार आहे.

<><><><><>

बँकॉकमध्ये होत असलेल्या थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारताच्या पी. व्ही. सिंधू हिने महिला एकेरीच्या तर लक्ष्य सेन आणि किदाम्बी श्रीकांत याने पुरुष एकेरीच्या उपउपांत्यपूर्व फेरीत प्रवेश केला आहे. मिश्र दुहेरीत मात्र भारताच्या अशित- अमृता आणि ध्रुव-तनिशा या दोन्ही जोड्यांना पराभवाचा सामना करावा लागला.

<><><><><>

उत्तर प्रदेशात वादळी पावसामुळे घडलेल्या विविध दुर्घटनांमध्ये गेल्या २४ तासांत ८९ जणांचा मृत्यू झाला आहे, तर ५३पेक्षा जास्त जण जखमी झाले आहेत. हवामानात अचानक झालेल्या बदलामुळे राज्यभरात धुळीचं वादळ आणि विजांच्या कडकडाटासह मुसळधार पाऊस पडला. धुळीचं वादळ आणि गारपिटीमुळे भिंत कोसळणं, झाडं किंवा विद्युत खांब अंगावर पडून लोक मृत्युमुखी पडले. मुख्यमंत्री योगी आदित्यनाथ यांनी या दुर्घटनांबद्दल शोक व्यक्त केला असून पुढच्या २४ तासात नुकसानग्रस्तांना भरपाई देण्याचे आदेश दिले आहेत.

<><><><><>

राज्याच्या काही भागात उन्हाची काहिली आहे तर काही ठिकाणी पाऊस पडत आहे. लातूर जिल्ह्यात आज पुन्हा एकदा अवकाळी पावसाने हजेरी लावली. काही भागांत हलक्या ते मध्यम स्वरूपाच्या सरी कोसळल्या. शहरातही मध्यरात्रीनंतर हलक्या पावसाच्या सरी बरसल्याने वातावरणात गारवा आला. मात्र, या अवकाळी पावसाचा फटका आंबा उत्पादक शेतकऱ्यांना बसला आहे. काही ठिकाणी फळगळ मोठ्या प्रमाणात झाल्यानं आर्थिक नुकसानची भीती व्यक्त होत आहे.

**कोल्हापूर जिल्ह्यात** काल संध्याकाळी विजांच्या गडगडाटासह जोरदार पाऊस झाला. रात्रीही पावसाच्या सरी बरसत होत्या. या पावसामुळे वातावरणातील उष्मा कमी झाला आहे.

<><><><><>

मुंबई, ठाणे, रायगड, पालघर, सिंधुदुर्ग आणि रत्नागिरीसह मराठवाड्यात पुढचे दोन दिवस उष्णतेच्या लाटेचा इशारा हवामान विभागाने दिला आहे. पुणे, नाशिक, अहिल्यानगर, जळगाव इथं आज उष्णतेची लाट येण्याची शक्यता आहे. तर कोल्हापूर, सातारा, सांगली, सोलापूर, नांदेड, लातूर, धाराशिव मधे पुढचे दोन दिवस तुरळक ठिकाणी विजांच्या कडकडाटासह पाऊस पडण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

//<><><><><>//